RNI No. MAHENG/2009/35528
Reg. No. MH/MR/South-344/2014-16

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष ६, अंक ४५ (३)] सोमवार, डिसेंबर २२, २०१४/पौष १, शके १९३६ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २७.००

असाधारण क्रमांक १११

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of Article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Land Revenue Code (Second Amendment) Act, 2014 (Mah. Act, No. XXXVII of 2014), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

M. A. SAYEED,
Principal Secretary and R.L.A. to Government
Law and Judiciary Department.

## MAHARASHTRA ACT No. XXXVII OF 2014.

*(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 22nd December 2014).*

An Act further to amend the Maharashtra Land Revenue Code, 1966.

WHEREAS both Houses of the State Legislature were not in session;

AND WHEREAS the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Land Revenue Code, 1966, for the purposes hereinafter appearing; and, therefore, promulgated the Maharashtra Land Revenue Code (Amendment) Ordinance, 2014, on the 22nd August 2014 ;

Mah. XLI of 1966. Mah. Ord. XVII of 2014.

AND WHEREAS it is expedient to replace the said Ordinance by an Act of the State Legislature; it is hereby enacted in Sixty-fifth Year of the Republic of India as follows :—

Short title and commencement.

**1.** *(1)* This Act may be called the Maharashtra Land Revenue Code (Second Amendment) Act, 2014.

*(2)* It shall be deemed to have come into force on the 22nd August 2014.

Amendment of section 2 of Mah. XLI of 1966.

**2.** In section 2 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (hereinafter referred to as "the said Code"), after clause (*7*), the following clause shall be inserted, namely :— Mah. XLI of 1966.

"*(7-A)* "Data Bank" is a bank repository of information maintained at the concerned Collector office, conclusively certified by the District Head of the concerned Department and updated by him from time to time, which shall be used by the Collector for ascertaining the objection, if any, of the concerned Department, while granting permission for use of land for non-agricultural purposes under the Code ;".

Insertion of section 42A in Mah. XLI of 1966.

**3.** After section 42 of the said Code, the following section shall be inserted, namely :—

No permission required for change of use of land situate in area covered by Development plan.

"**42A.** (*1*) Notwithstanding anything contained in section 42,—

(*a*) no prior permission of the Collector shall be necessary for conversion of use of any land held as an Occupants—Class I for any purpose as defined in the sanctioned Development plan or draft Development plan prepared and published as per the provisions of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 ; however, the Planning Authority shall ascertain from the concerned revenue authority the Class of land, its occupancy and encumbrances, if any, thereupon, and after ascertaining the same, it shall grant the development permission as per the provisions of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 ; Mah. XXXVII of 1966. Mah. XXXVII of 1966.

(*b*) for conversion of use of any land held as an Occupants—Class II or land leased by the Government, for any purpose as defined in the sanctioned Development plan or draft Development plan prepared and published as per the provisions of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, the occupant shall apply to the Planning Authority for permission to change the use of land, and the Planning Authority shall direct the said occupant to obtain no objection certificate of the Collector for such change ; the Collector shall examine the documents by which the land is granted and the relevant laws by which the concerned land is governed and, if permissible to grant no objection certificate, require the applicant to pay the *Nazarana* and the Government dues for that purpose ; and on payment of the same, the Collector shall issue no objection certificate for change of use of such land ; on receipt of such certificate, the concerned Planning Authority shall issue development permission as per the provisions of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Mah. XXXVII of 1966. Mah. XXXVII of 1966.

*(2)* The person to whom permission is granted under clause *(b)* of sub-section (*1*) or the person who converts the use of land in view of clause (*a*) of sub-section (*1*) shall inform in writing to the village officer and the Tahsildar within thirty days from the date on which the change of use of land commenced.

*(3)* If the person fails to inform the village officer and the Tahsildar within the period specified in sub-section (2), he shall be liable to pay in addition to the non-agricultural assessment, a fine of rupees twenty-five thousand or forty times of the non-agricultural assessment, whichever is higher.

*(4) (a)* On receipt of the information in writing from the person, who obtained the development permission, and on payment of conversion tax at the rate mentioned in section 47A and the non-agricultural assessment therefor, it shall be incumbent upon the concerned revenue authority to grant him *sanad* in the form prescribed under the rules within a period of thirty days from payment thereof. In case of delay in issuing such *sanad,* the concerned authority shall record his reasons for the same.

Where there is any clerical or arithmetical error in the *sanad* arising from any accidental slip or omission, it shall be lawful for the concerned authority either of his own motion or on the application of a person affected by the error, to direct at any time the correction of any such error.

*(b)* While granting no objection certificate for the use of land under clause *(b)* of sub-section *(1)* or permission under the Code, the Collector shall grant the no objection certificate or permission relying upon the Data Bank prepared and certified by the concerned authorities at the District level.

*(c)* It shall be the responsibility of the District Head of the concerned Department to update the Data Bank, from time to time.".

Power to remove difficulty.

Mah. XLI of 1966. Mah. XLI of 1966.

**4.** *(1)* If any difficulty arises in giving effect to the provisions of the Maharashtra Land Revenue Code, 1966, as amended by this Act, the State Government may, as occasion arises, by order published in the *Official Gazette,* do anything not inconsistent with the provisions of the Maharashtra Land Revenue Code, 1966 as amended by this Act, which appears to it to be necessary or expedient for the purpose of removing the difficulty:

Provided that, no such order shall be made after the expiry of a period of two years from the date of commencement of this Act.

*(2)* Every order made under sub-section *(1)* shall be laid, as soon as may be, after it is made, before each House of the State Legislature.

Repeal of Mah. Ord. XVII of 2014 and saving.

Mah. Ord. XVII of 2014.

**5.** *(1)* The Maharashtra Land Revenue Code (Amendment) Ordinance, 2014, is hereby repealed.

*(2)* Notwithstanding such repeal, anything done or any action taken (including any notification or order published) under the corresponding provisions of the said Code, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done or taken or issued, as the case may be, under the corresponding provisions of the said Code, as amended by this Act.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT PRESS, CIVIL LINES, NAGPUR 440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.

RNI. No. MAHBIL/2009/35530
Reg. No. MH/MR/South-341/2014-16

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ६, अंक २९ (२)] सोमवार, डिसेंबर २२, २०१४/पौष १, शके १९३६ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक ६७

प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

दिनांक २१ डिसेंबर २०१४ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**एम. ए. सईद,**
प्रधान सचिव व विधी परामर्शी,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक २२ डिसेंबर २०१४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९६६ चा महा. ४१. २०१४ चा महा. अध्या. १७.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६, यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २२ ऑगस्ट २०१४ रोजी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अध्यादेश, २०१४ प्रख्यापित केला होता ;

**आणि** ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे, त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पासष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—



भाग -चार-६७-१.
एचबी-२१३४-१.

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०१४ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २२ ऑगस्ट २०१४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम २ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त संहिता " असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ मध्ये, खंड (७) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— १९६६ चा महा. ४१.

" (७-अ) "आधारसामग्री संचयिका" म्हणजे संबंधित विभागाच्या जिल्हा प्रमुखाने निर्णायकतेने प्रमाणित केलेला आणि त्याने वेळोवेळी अद्ययावत करून, संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयात सुस्थितीत ठेवलेल्या माहितीचा संचयिका संग्रह होय, जो संहिते अन्वये अकृषिक प्रयोजनांसाठी जमिनीच्या वापराबद्दलची परवानगी देताना संबंधित विभागाच्या आक्षेपाची, कोणतेही असल्यास, विनिश्चिती करून घेण्यासाठी, जिल्हाधिकाऱ्याकडून वापरण्यात येईल ; ".

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ यामध्ये कलम ४२अ समाविष्ट करणे.

३. उक्त संहितेच्या कलम ४२ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

विकास योजनेमध्ये समाविष्ट केलेल्या क्षेत्रात स्थित असलेल्या जमिनीच्या वापरात बदल करण्यासाठी परवानगीची आवश्यकता नसणे.

"**४२अ.** (१) कलम ४२ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही,—

(अ) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या तरतुदींनुसार तयार केलेल्या व प्रसिद्ध केलेल्या मंजूर विकास योजनेत किंवा प्रारूप विकास योजनेत निश्चित केल्याप्रमाणे कोणत्याही प्रयोजनाकरिता भोगवटादार–वर्ग एक म्हणून धारण केलेल्या कोणत्याही जमिनीच्या वापराचे रूपांतरण करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याच्या कोणत्याही पूर्वपरवानगीची आवश्यकता असणार नाही ; तथापि, नियोजन प्राधिकरण, जमिनीचा वर्ग, तिचा भोगवटा आणि तीवरील भार, कोणताही असल्यास, याची संबंधित महसुली प्राधिकाऱ्याकडून विनिश्चिती करील आणि त्याबाबतची विनिश्चिती केल्यानंतर, ते महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या तरतुदींनुसार विकासाची परवानगी देईल ; १९६६ चा महा. ३७.

(ब) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या तरतुदींनुसार तयार करण्यात आलेल्या व प्रसिद्ध करण्यात आलेल्या मंजूर विकास योजनेत किंवा प्रारूप विकास योजनेत निश्चित केल्याप्रमाणे कोणत्याही प्रयोजनाकरिता, भोगवटादार-वर्ग दोन म्हणून धारण केलेल्या कोणत्याही जमिनीच्या किंवा शासनाकडून पट्ट्याने घेतलेल्या जमिनीच्या वापराचे रूपांतरण करण्यासाठी, भोगवटादार, जमिनीच्या वापरातील बदलाच्या परवानगीसाठी नियोजन प्राधिकरणाकडे अर्ज करील, आणि नियोजन प्राधिकरण, उक्त भोगवटादाराला अशा बदलासाठी जिल्हाधिकाऱ्याची ना हरकत मिळविण्याचे निदेश देईल ; जिल्हाधिकारी, ज्या दस्तऐवजांद्वारे जमीन दिली जाते त्या दस्तऐवजांची आणि ज्या संबद्ध कायद्यांद्वारे संबंधित जमिनीचे नियमन केले जाते त्या संबद्ध कायद्यांची तपासणी करील आणि जर अर्जदाराला ना हरकत प्रमाणपत्र देणे अनुज्ञेय असेल तर त्यास, त्या प्रयोजनासाठी देय नजराणा आणि शासकीय देणी प्रदान करण्यास फर्माविल, आणि ती दिल्यानंतर, जिल्हाधिकारी अशा जमिनीच्या वापरातील बदलासाठी ना हरकत प्रमाणपत्र देईल; असे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर, संबंधित नियोजन प्राधिकरण, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या तरतुदींनुसार विकासाची परवानगी देईल. १९६६ चा महा. ३७.

(२) पोट-कलम (१) च्या खंड (ब) अन्वये ज्या कोणत्याही व्यक्तीला परवानगी दिली असेल अशी व्यक्ती किंवा ज्या व्यक्तीने पोट-कलम (१) च्या खंड (अ) नुसार जमिनीच्या वापराचे रूपांतरण केले असेल अशी व्यक्ती, ज्या दिनांकापासून जमिनीच्या वापरामधील बदलास सुरुवात केली असेल अशा दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, त्याबाबत ग्राम अधिकाऱ्यास आणि तहसीलदारास लेखी कळवील.

(३) अशी व्यक्ती पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत ग्राम अधिकाऱ्याला आणि तहसीलदाराला तसे कळविण्यास कसूर करील तर, ती व्यक्ती अकृषिक आकारणी देण्याबरोबरच आणखी पंचवीस हजार रुपयांचा द्रव्यदंड किंवा अकृषिक आकारणीच्या चाळीस पट इतकी रक्कम, यांपैकी जी अधिक असेल ती रक्कम देण्यास पात्र होईल.

(४)(अ) ज्या व्यक्तीस विकासाची परवानगी मिळाली असेल अशा व्यक्तीकडून लेखी माहिती मिळाल्यावर, आणि कलम ४७अ मध्ये नमूद केलेल्या दराने रूपांतरण कराचा आणि त्याबद्दलच्या अकृषिक आकारणीचा भरणा केल्यावर, असा भरणा केल्यापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत, नियमांन्वये विहित करण्यात आलेल्या नमुन्यात, त्या व्यक्तीला सनद देणे हे संबंधित महसुली प्राधिकाऱ्यावर बंधनकारक असेल. अशी सनद देण्यात विलंब झाल्यास, संबंधित प्राधिकारी त्याबद्दलची कारणे लेखी नमूद करील.

कोणत्याही अभावित चूकभुलीमुळे सनदीमध्ये कोणताही लेखनदोष अथवा अंकगणितीय चूक उद्‌भवली असेल त्याबाबतीत, संबंधित प्राधिकाऱ्याने एकतर स्वत:हून किंवा चुकीमुळे बाधित झालेल्या व्यक्तीच्या अर्जावरून, कोणत्याही वेळी, अशी कोणतीही चूक दुरुस्त करण्याचा निदेश देणे हे, विधिसंमत असेल.

(ब) पोट-कलम (१) च्या खंड (ब) अन्वये जमिनीच्या वापराबद्दलचे ना हरकत प्रमाणपत्र देताना किंवा संहिते अन्वये परवानगी देताना, जिल्हाधिकारी, जिल्हास्तरावरील संबंधित प्राधिकाऱ्यांनी तयार केलेल्या व प्रमाणित केलेल्या आधारसामग्री संचयिकेचा आधार घेऊन ना हरकत प्रमाणपत्र किंवा परवानगी देईल.

(क) आधारसामग्री संचयिका वेळोवेळी अद्ययावत करण्याची जबाबदारी ही, संबंधित विभागाच्या जिल्हा प्रमुखाची असेल.".

१९६६ चा महा. ४१. ४. (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी, त्यास आवश्यक वा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे करता येईल : (१९६६ चा महा. ४१.) अडचणी दूर करण्याचा अधिकार.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यावर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) खाली काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

२०१४ चा महा. अध्या. १७. ५. (१) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अध्यादेश, २०१४ याद्वारे निरसित करण्यात येत आहे. सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १७ चे निरसन व व्यावृत्ती.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या उक्त संहितेच्या तत्सम तरतुदींन्वये केलेली कोणतीही कृती किंवा करण्यात आलेली कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, उक्त संहितेच्या तत्सम तरतुदींन्वये केलेली कोणतीही कृती किंवा करण्यात आलेली कोणतीही कार्यवाही किंवा यथास्थिती, काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT PRESS, CIVIL LINES, NAGPUR - 440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.